दै. गोदातीर दि. 04/08/24

# दुचाकी चोरी, जबरी चोरीच्या गुन्ह्यातील तिघांना अटक; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



**नांदेड-** माली गुन्ह्यातील गुन्हेगारांना अटक करण्याचे आदेश पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी स्थागुशाचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय नांदेड यांना दिले होते. त्यानुसार खंडेराय यांनी वेगवेगळी पथके तयार करुन मालाविषयीचे गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेणे चालु केले. स्थागुशाचे पथकास मिळालेल्या गुप्त बातमीआधारे दि. २ ऑगस्ट रोजी हिंगोली गेटकडे जाणाऱ्या रस्त्यावरुन दिलीप अशोक कांबळे (वय २५ वर्ष रा. अजनी ता. बिलोली जि. नांदेड), अविनाश बाबु भरांडे (वय २९ वर्ष रा. अजनी ता. बिलोली जि. नांदेड) आणि एक विधीसंघर्षीत बालक यांच्याकडून हिरो कंपनीची दुचाकी हस्तगत करण्यात आली. तसेच विविध गुन्ह्यातील नगदी २६ हजार रुपये असे एकुण ३८ हजार रुपये जप्त करण्यात आले. नमुद आरोपीतांना पोलीस ठाणे वजिराबाद येथे पुढील तपासकामी देण्यात आले आहे. सदरची कामगिरी स्थागुशाचे पोउपनि मिलींद सोनकांबळे यांच्या पथकाने केली. तसेच उस्मानपुरा छत्रपती संभाजीनगर येथील खुनाच्या गुन्ह्यात शिक्षा झालेला फरार आरोपी दिनेश अर्जुनसिंह ठाकुर (वय २९ राहणार जवळा मुराद ता. मुदखेड हा पॅरोलवर सुटला होता. परंतु तो परत कारागृहात न जाता फरार होता. त्यालाही या पथकाने नांदेडच्या हुजूर साहेब रेल्वे स्थानक परिसरातून अटक केली.

...करिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर...
येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील. ईमेल: godateer@gma...
/ लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४